23/5

महाराष्ट्र शासन

क्र.बाहआ-२०११/प्र.क्र.११५/का.९
महिला व बाल विकास विभाग,
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ३२.
दिनांक :- १८ डिसेंबर, २०११.

## कार्यालयीन आदेश

शासन अधिसुचना महिला व बाल विकास विभाग दि. ०२ डिसेंबर, २००८ अन्वये महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे अध्यक्ष व सहा सदस्यांच्या नियुक्त्या करण्यात आलेल्या होत्या. सदर अधिसूचने अन्वये अध्यक्ष व सदस्यांचा कार्यकाळ अधिसूचनेच्या दिनांकापासून ३ वर्षे किंवा शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल तो पर्यंत सुरु राहील असे नमुद करण्यात आले होते. त्यानुसार आता आयोगाच्या अध्यक्ष व सदस्यांचा कार्यकाळ दि. ०१.१२.२०११ रोजी ३ वर्षांची कालमर्यादा संपुष्टात येत आहे. आयोगाच्या नविन अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती करण्याची कार्यवाही सुरु असून त्यास काही कालावधी लागणार असल्याने अध्यक्ष पदाचा कार्यभार प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग यांनी सचिव, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग यांच्या मदतीने आयोगाचे कामकाज गठण होईपर्यंत पहावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(शं. शा. पढाळ)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत-
मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. मंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ३२.
मा. राज्यमंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ३२.
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई.

C:\Gun\2011\257.-Karyalayin aadesh.-1.doc